Maharashtra State
Board Secondary & Higher Secondary Education,
Nashik Divisional Board,Nashik-422 003

महाराष्ट्र राज्य
माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ,नाशिक-422 003.

Email-nsksec@rediffmail.com website - www.sscboardnashik.com

क्रमांक / नाविमं / लेखा / टं.वि.फीमाफी / 2515
नाशिक - ४२२००३
दिनांक : 04/01/2022

प्रति,

मुख्याध्यापक व प्राचार्य
मान्यताप्राप्त सर्व संबंधित
शाळा व कनिष्ठ महाविद्यालय

विषय – सन २०१७–१८, २०१८–१९ आणि सन २०१९–२०२० मधील टंचाईग्रस्त / दुष्काळग्रस्त आणि अवेळी पावसामुळे बाधित क्षेत्रातील विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्क प्रतिपूर्ती योजना ऑनलाईन माहिती देणेसाठी मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ –राज्य मंडळाचे परिपत्रक क्र.रा.मं / अंदाजपत्रक / टं.वि.फीमाफी / ७१५६ दि. २२/१२/२०२१.

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून आपणास सुचित करण्यात येते की, सन २०१७–१८, २०१८–१९ मधील इ. १० वी व इ. १२ वीच्या परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीस पात्र असलेल्या आणि अद्याप परीक्षा शुल्क अदा न झालेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क अदा करणेसाठी तसेच सन २०१९–२०२० मधील अवेळी पावसामुळे ३४ जिल्हयातील ३४९ तालुक्यातील बाधित क्षेत्रातील इ. १० वी आणि इ. १२ वीच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्क प्रतिपूर्तीस पात्र असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती अनुक्रमे SSC ('http://feerefund.mh-ssc.ac.in व HSC (http://feerefund.mh-hsc.ac.in ह्या लिंकवर उपलब्ध करून दिलेली असुन सदर लिंक मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर http://mahahsscboard.in यावर प्रसिध्द करून दि. ३०/०९/२०२१ पर्यंत मागविण्यात आलेली होती.

परंतू सदर नवीन प्रणालीमध्ये माहिती भरताना अनेक माध्यमिक शाळा /उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना अडचणी येत आहेत तसेच कोविड १९ चा प्रादूर्भाव विचारात घेता सदर योजनेच्या कार्यप्रणालीस दि. २८/०२/२०२२ **पर्यंत मुदतवाढ** देण्यात येत आहे. याची नोंद घ्यावी.

तसेच आपणास सुचित करण्यात येते की, लाभार्थी विद्यार्थ्यांचे अचूक आधार क्रमांक नमूद करावे व सदर माहिती विहित मुदतीत भरावी.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्य, व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक – 422003

प्रत माहितीस्तव तथा तातडीच्या पुढील कार्यवाहिसाठी --

१ विभागीय शिक्षण उपसंचालक, नाशिक
२ शिक्षणाधिकारी (माध्यमिक), नाशिक, जळगाव,धुळे व नंदुरबार

यांना कळविण्यात येते की, तातडीने सर्व मुख्याध्यापक / प्राचार्य यांचेशी समक्ष संपर्क साधून बाधित क्षेत्रातील पात्र विद्यार्थ्यांची माहिती ऑनलाईन पध्दतीने राज्यमडळास विहित वेळेमध्ये सादर होण्याच्या दृष्टीने पाठपरावा करावा.